पुणे, वर्ष १, अंक २, डिसेंबर २०१० ₹३०

# अर्थपूर्ण

व्यक्ती, समाज आणि देशाच्या परिपूर्ण विकासासाठी...

स्वाभिमानी, आनंदी, परिपूर्ण जीवनाचा करु स्वीकार; बेरोजगारी, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, दहशतवादाला देऊ नकार



# लोकशाहीचे ‘उदारीकरण’

**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकाच्या अखेरीस जगात दोन महत्त्वाच्या घटना घडून गेल्या आहेत. उर्वरित शतकातील विधायक बदलांची सुरवात इतक्या गोंधळाने व्हावी, हे दुर्दैवी असले तरी त्याचा स्वीकार करूनच आपल्याला पुढे जावे लागणार आहे. पहिली आहे ती चीनमधील लोकशाहीवादी लेखक लिजियाओबो यांना नॉर्वेची राजधानी ओस्लो येथे ते किंवा त्यांचे नातेवाईक उपस्थित नसताना शांततेसाठीचा सर्वोच्च नोबेल पुरस्कार देण्यात आला. पुरस्कार ज्यांना मिळाला त्यांच्यापैकी कोणीच उपस्थित नसताना नोबेल पुरस्कार वितरणाची ही पहिलीच वेळ. या समारंभात पुरस्कार विजेत्याची खुर्ची मुद्दामच रिकामी ठेवण्यात आली. जियाओबो यांना नोबेल पुरस्कार देणे, हेच मुळी चीनला मान्य नाही. त्यामुळे त्यांना तुरुंगातून सोडण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. मात्र इतर देशांनीही या समारंभाला उपस्थित राहू नये, अशी गळ चीनने घातली होती. अर्थात काही मोजके देश सोडता भारतासह अनेक देशांनी आपले प्रतिनिधी या समारंभाला जातील, याची काळजी घेतली. आश्चर्य म्हणजे चीनच्या अध्यक्षांनी त्यानंतर काही दिवसांतच नॉर्वेचा अधिकृत दौरा केला. एकेकाळी या विषयावरून या दोन देशांनी युद्ध केले असते! लोकशाहीचा पुरस्कार वाईट नाही, हेच एकप्रकारे चीनसह सर्व जगाने मान्य केले आहे, ही ती पहिली घटना.

लोकशाहीसाठी संघर्ष करणाऱ्या जियाओबो यांना सन्मानित केले जात असतानाच दुसरीकडे आंतरखंडीय विकिलिक्स टीमने जगासमोर ‘सभ्य’ जगाच्या अर्थ आणि राजकारणाचा जो लेखाजोखा अडीच लाख ‘अतिगोपनीय’ राजनैतिक दस्तऐवज प्रसिद्ध करून मांडला आहे, त्यातून जगाच्या आमूलाग्र परिवर्तनाची एक नवी सुरवात झाली आहे. ज्या अर्थकारण आणि राजकारणाने जगातील सभ्यतेचा ठेका घेतला आहे, तेच माणसाच्या अस्तित्वाच्या कसे मुळाशी उठले आहे, याचा पर्दाफाश विकिलिक्समुळे होतो आहे. मर्यादित लोकशाहीचा उदोउदो ज्यांनी केला ते सत्यापुढे किती केविलवाणे होतात आणि मग त्यांच्यापुढे उद्दामपणाशिवाय पर्याय राहत नाहीत, हेच विकिलिक्सचे मुख्य संपादक ज्युलियन असांज यांच्यामागे


असांज


जियाओबो

महासत्ता लागल्या, यातून स्पष्ट झाले आहे. जग जवळ आणणारे वेबजगत असे खरोखरचे ‘उदारीकरण’ समोर आणून ठेवील, अशी कल्पनाच कोणी केली नव्हती. प्रशासन आणि आर्थिक व्यवहारातील पारदर्शकतेचा आग्रह तर प्रत्येक लोकशाहीवादी देशाने आणि जगाचे नेतृत्व करणाऱ्या राजकीय नेत्यांनी धरला आहे. मात्र हे तंत्रज्ञान आपल्याच लांड्यालबाड्यांना असे जगाच्या चव्हाट्यावर आणेल, असे त्यांना वाटले नव्हते. केवळ देशाचाच नव्हे तर जगाचा कारभार पारदर्शक व्हावा, असे म्हणणे सोपे आहे, मात्र तसे करण्यासाठी आपल्या हितसंबंधांना तिलांजली द्यावी लागेल, याचा अंदाज या धुरीणांना आला नसावा. एकविसावे शतक असे सामान्य माणसाचे शतक ठरणार आहे. ज्या शतकात जिंदाबाद-मुर्दाबाद न करता प्रत्येकाला माणसाचे जीवन जगता येईल. ‘मी जगाचा नागरिक आहे’,असे म्हणण्याची संधीही हे शतक प्रत्येकाला देणार आहे. पण हा टप्पा गाठण्यासाठी मोठ्या ‘स्वच्छता मोहिमां’ची गरज आहे. विकिलिक्सने केलेला पर्दाफाश आणि भारतातील गैरव्यवहारांत गुंतलेल्या माणसांना शिक्षा झाली पाहिजे, यासाठीचा वाढत चाललेला रेटा ही त्याची सुरवात आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांनी, ‘१००टक्के उदारीकरण अमेरिकेला परवडणारे नाही’,असे एका भाषणात म्हटले होते. ते जागतिक अर्थकारण आणि व्यापाराच्या संदर्भात बोलत होते. लोकशाहीच्या या उदारीकरणाने ओबामांचे म्हणणे असे खरे करून दाखविले आहे. जगातील आर्थिक, राजकीय व्यवहार कसे कृत्रिमरीत्या घडवून आणले जातात, हे विकिलिक्सच्या या गौप्यस्फोटांमुळे जगाच्या चावडीवर आले आहे. आपली गुप्त खलबते उघड झाल्यावर माणसे जशी



# सत्यमेव जयते!

तोंड लपवून पळतात, तशी वेळ देशप्रमुखांवर आली आहे! विकिलिक्सकडे आणखी काही लाख कागदपत्रे आहेत आणि ती टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येत आहेत, अशी एक माहिती जाहीर झाली आहे. आता विकिलिक्सच्या प्रमुखाला किरकोळ गुन्ह्याखाली अटक केल्यानंतर हे कागद जगासमोर येत राहणार काय, असाही प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र सभ्यतेचा ठेका घेतलेल्या जागतिक समूहाची या पेचातून लवकर सुटका होण्याची शक्यता नाही, आणि होऊच नये. पापांचा घडा भरल्यामुळे 'सत्याचे भूत' आता त्यांच्या मानगुटीवर बसले असून या 'भुताच्या' मागण्या मान्य करणे हीच एकविसाव्या शतकाची खरी सुरवात आहे. विकिलिक्सचे प्रमुख आणि त्याचे सहकारी तरुण आहेत आणि जगासमोर सत्य आणण्याची ही प्रेरणा त्यांच्या मनात किमान एक दशक ठाण मांडून असणार, याचा अर्थ शतक उगवतानाच ती झाली, हे उघड आहे.

माणसाचा प्रवास माणूसपणाची प्रतिष्ठा वाढविण्याच्या दिशेने चालला आहे की तो अजूनही पशूच आहे, हेही नजीकच्या भविष्यात स्पष्ट होणार आहे. लोकशाहीच्या बुरख्याखाली काय काय चाललेले असते, हे जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाही मानल्या गेलेल्या अशा भारत आणि अमेरिकेमध्ये पाहायला मिळाले आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने म्हणजेच पर्यायाने अमेरिकेने जगाला कसे वेठीस धरले आहे, हे विकिलिक्समुळे उघडकीस आले आहे. तर भारतातील कोट्यवधी रुपयांच्या दररोज उघडकीस येणाऱ्या गैरव्यवहारांमुळे लोकशाहीतील प्रशासनाची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. जगातील दुसऱ्या क्रमांकाची लोकशाही, सातव्या क्रमांकाची भूमी, चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आणि जगातील एक श्रेष्ठ संस्कृती ही अजूनही खास लोकांच्याच घरात पाणी भरते, हेही या व्यवहारांमुळे समोर येते आहे. हे व्यवहार असे उघडेनागडे समोर आल्यामुळे आणि त्यांच्यावर पोसलेल्या सभ्यतेलाही तडा गेल्यामुळे व्यवस्थेत काही मुळातून बदलाची दिशा आपण पकडणार की निर्लज्जपणे त्यातच आपापले हितसंबंध साधून घेत जगणार, हा लाखमोलाचा प्रश्न काळाने संवेदनशील माणसांपुढे मांडला आहे.

महात्मा गांधी नावाच्या माणसाचा जन्म याच भारतभूमीत होऊन गेला. केवळ व्यक्तिपूजा म्हणून नव्हे पण त्यांनी सांगितलेल्या जीवनशैलीला शरण जावे लागते म्हणून जग त्यांच्या जीवनाचा अभ्यास करते आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात ज्या सत्याचा आग्रह धरला ते 'सत्यमेव जयते' हे वचन आम्ही 'मुंडकोपनिषदा'तून घेतले आणि ते आमच्या सिंहशीर्ष या राष्ट्रचिन्हाच्या खाली दिमाखात कोरले गेले आहे. अपेक्षा अशी आहे की या वचनाचे भारतीयांना सतत स्मरण राहावे. आमच्या चलनावरही आम्ही त्याला आवर्जून स्थान दिले. व्यवहार करतानाही 'सत्यमेव जयते'चा विसर पडू नये म्हणून. ती ओळख आपल्याला सच्चे भारतीय म्हणून टिकवावीच लागणार आहे. आज जगात सर्वात भ्रष्ट देश अशी आमची ओळख नसली तरी पारदर्शकतेत आमच्या पुढे ८६ देश आहेत, ही वस्तुस्थिती आमची मान खाली तुकविण्यास पुरेशी आहे. एक गोष्ट खरी ती म्हणजे खऱ्या गोष्टी लपविण्यासाठी जी 'जागतिक धावपळ' चालू आहे, ती केविलवाणी ठरते आहे.

'अर्थपूर्ण'च्या पहिल्या अंकाचे आपण सर्वांनी जे स्वागत केले, त्यामुळे सत्याच्या मार्गाकडे वाटचाल करण्याचा एक छोटा प्रयत्न प्रशस्त झाला आहे. जगाला खऱ्या लोकशाहीकडे नेणाऱ्या, पारदर्शकतेचा आग्रह धरणाऱ्या आणि कोट्यवधी रुपयांचे गैरव्यवहार उघडकीस आणणाऱ्या घटना याच टप्प्यावर व्हाव्यात, हा सामान्य माणसाला मानवी प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या अशा छोट्या छोट्या प्रयत्नांसाठीचा शुभसंदेश मानून हा प्रवास चालू ठेवूयात...